# Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

**22nd Sept.2018**

## Organizer

**Deparitment of Political Science,**

**Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary
Research Journal (AIIRJ)
**ISSN 2349-638x**
**Peer Review and Indexed Journal**
**Impact Factor 4.574**
**Website www.aiirjournal.com**
**Email :- aiirjpramod@gmail.com**



Scanned with CamScanner

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 58 | डॉ. राजेखान शानेदिवाण | समकालीन संदर्भात मुस्लिमांची मराठी कादंबरी | 174 To 177 |
| 59 | डॉ.दीपककुमार चळवी | विश्वातील मानवजातीसाठी मुलींच्या शिक्षणाच्या हक्काची स्थापना करणारी : मलाला | 178 To 180 |
| 60 | काशिलींग रघुनाथ गावडे | शिवचरित्रातील एक मिथक 'वाघ्या' कुत्रा | 181 To 184 |
| 61 | डॉ. कृष्णा भवारी | आदिवासी महादेव कोळी जमातीचे समाजशास्त्र आणि भाषिक आव्हाने | 185 To 186 |
| 62 | माधवी सुरेंद्र पवार | कविता महाजन यांच्या 'ब्र'कांदबरीचा स्त्रीवादी दृष्टीने अभ्यास | 187 To 190 |
| 63 | प्रा. डॉ. साहेबराव भानुदासराव शिंदे | समकालीन मराठी ग्रामीण साहित्यापुढील आव्हाने | 191 To 193 |
| 64 | प्रा.डॉ. मधुकर श्रीरंग पवार | महाराष्ट्रातील संताच्या साहित्यातून येणारा सामाजिक विचार | 194 To 196 |
| 65 | निलम पाटील | शिलादित्य कादंबरीतील भाषिक वेगळेपण | 197 To 200 |
| 66 | प्रणिता शिवाजी वंगलवार | मराठी भाषेपुढील आव्हाने | 201 To 204 |
| 67 | सौ.प्रेरणा एल.चव्हाण | आव्हानात्मक- 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' | 205 To 208 |
| 68 | डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्रे | जागतिकीकरण आणि समकालीन वाङ्मयीन प्रवाह | 209 To 213 |
| 69 | प्रा. राजश्री विसुरे | सानिया यांच्या कथात्म साहिकत्यातील स्त्री जाणीवा | 214 To 216 |
| 70 | रेखा काशिनाथ पसाले | जागतिकीकरणाचा समकालीन मराठी कादंबरीवरील परिणाम | 217 To 218 |
| 71 | प्रा. सौ.एस.एस.पाटील | भ्रमणध्वनीवरील मराठी संवेदन भाषा – एक नवे आव्हान | 219 To 221 |
| 72 | प्रा.डॉ. सागर अशोक लटके | साहित्यविचार आणि कथनमीमांसा | 222 To 225 |
| 73 | प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | समकालीन साहित्यिकांच्या लेखनाचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर पडलेला प्रभाव | 226 To 228 |
| 74 | डॉ.सारीपुत्र तुपेरे | समकालीन दलित कविता | 229 To 230 |
| 75 | श्रीमती शैलजा श्रीधर शिंदे | समकालीन मराठी भाषेमधील बोलींचे महत्त्व | 231 To 233 |
| 76 | प्रा. शिवदास दगा पावरा | जागतिकीकरण आणि पावरा जमातीची संस्कृती | 234 To 235 |
| 77 | डॉ.सिंधु जयवंत आवळे | उत्तम कांबळे यांच्या 'अस्वस्थ नायक' मधील वर्तमानकालीन सुशिक्षित बेकाराची अस्वस्थता | 236 To 237 |
| 78 | प्रा. डॉ. सुभाष पाटील | समकालीन मराठीतील आदिवासी साहित्य | 238 To 243 |
| 79 | प्रा. डॉ. युवराज देवाळे | मराठी साहित्य : काही प्रश्न आणि खूप आव्हाने | 244 To 245 |
| 80 | प्रा. सौ. मानसी संभाजी शिरगांवकर | स्वतंत्रता संग्राम में हिंदी के कथेत्तर साहित्य चिरंजीत का 'स्वर्णिम गौरव गाथा' रेडिओ नाटक का योगदान | 246 To 249 |
| 81 | प्रा.सौ.स्नेहलता सदाशिव पुजारी | वर्तमान पीढी में प्राचीन संस्कारक्षम साहित्य की अनभिज्ञता से निर्मित समस्या | 250 To 252 |




161

Scanned with CamScanner

# आदिवासी महादेव कोळी जमातीचे समाजशास्त्र आणि भाषिक आव्हाने

प्रा. डॉ. कृष्णा भवारी
कन्या महाविद्यालय कडेगांव, जि.सांगली

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारताता विविध धर्म, जाती, जमाती, त्यांच्या भाषा, पोषाख यात्रावतीत विविधता अढळून येते. प्रत्येक जाती धर्माचे लोक आपापल्या परंपरेनुसार आचार विचाराच्या दृष्टीने स्वाभिमानी जीवन जगतात. प्रत्येक समाजाची एक विशिष्ट अशी संस्कृती असते. जसे की, नागर संस्कृती, ग्रामीण संस्कृती, आदिवासी संस्कृती इ. पहिल्या दोन संस्कृतीपेक्षा काहीशी वैशिष्टयपूर्ण व सांस्कृतिक दृष्टीने आदिवासी संस्कृती वेगळी आहे.

आदिवासी हा जागतिक स्तरावरील एक महत्वाचा घटक आहेत. मानववंशशास्त्रज्ञींनी भारतीय आदिवासींचे तीन विभागात विभागणी केली आहे. १. मध्य भारत, (प्रोटो ऑस्ट्रेलिया) २.उत्तर व दक्षिण भारत (मंगोलाईड) ३. दक्षिण भारत व अंदमान बेट (नेग्रिटी) हे झाले भारतापुरते. पण आदिवासी समाज हा भारताप्रमाणे अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया यांसारख्या अनेक विकसित, विकसनशील व अविकसित देशांमध्ये आढळतो. भारतामध्ये एकूण ४६१ आदिवासी जमाती आहेत. त्यातील महाराष्ट्रात एकूण ४५ जमाती अस्तित्वात आहेत. हेमनडार्फ या विचारवंताच्या मते,"ज्या काळात आर्य भारतात आले त्याकाळात द्रविड लोक पश्चिम किना–यावर समुद्रमार्गे आले. हा काळ खिस्तपूर्व २००० ते १००० होय. वायव्य व दक्षिण प्रदेशातून आर्य व द्रविड लोकांनी हुसकावलेले मध्यक्षेत्रातील डोंगरात गेले ते आजचे आदिवासी."

महादेव कोळी ही आदिवासी जमात प्रामुख्याने पुणे जिल्हयाच्या पश्चिम पटटयात आणि सहयाद्रीच्या पर्वतरांगेत मोठया प्रमाणात आढळते. या जमातीत जी बोलीभाषा बोलली जाते तिला 'मावळीबोली' असे म्हणतात. आजही बोली हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गवर आहे. या परिसरात प्रमाण मराठी भाषेने मोठया प्रमाणात शिरकाव केल्याचे दिसते. एखादी भाषा जेव्हा नष्ट होते. तेव्हा त्या समाजाची सामाजिक, सांस्कृतिक हानी होत असते. म्हणून भाषेचे जतन करणे. तिचे संवर्धन करणे महत्वाचे आहे. जीवनातील भाषेचे महत्व व भाषेतील जीवनाचे महत्व याविषयी डॉ.कल्याण काळे व मृणालिनी शहा यांनी व्यक्त केलेले विचार निश्चितच मार्गदर्शक व महत्वपूर्ण असे आहेत. "मानवीजीवन भाषेशिवाय असूच शकत नाही. कारण माणूस जात्याच समाजशील प्राणी आहे. आणि कोणताही समाज षषेशिवाय अस्तित्वातच येऊ शकत नाही हे जसे खरे आहे. तसेच षषाव्यवहारात जीवनसापेक्ष आशय व्यक्त होणेही अपरिहार्य आहे. कोणतीही भाषा आकारहीन, रंगरुपहीन अशी संस्था नसते. तिला जो आकार, घाट प्राप्त होते. तो सर्वस्वी ती ज्या समाजात, संस्कृतीत प्रचलित असते. त्या संस्कृतीने, त्या समाजाने दिलेला असतो. त्यामुळे जीवनात भाषा असते. तसेच भाषेतही जीवन असतेच असते."

आदिवासी भाषांच्या संबंधी अलिकडे मोठयाप्रमाणात संशोधन झाल्याचे दिसते त्यात वर्णनात्मक पध्दतीचा वापर जास्त झाला आहे. विशिष्ट प्रदेशातील भाषिक नमुने गोळा करुन त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. पण सामाजिक शास्त्राच्या अंगाने विचार केल्यास समाजाच्या दृष्टीने संबंधित षषेला उपयोजनात्मक दृष्टीने किती महत्व दिले याचा शोध घेणे महत्वाचे ठरेल. अलिकडे शालेय पाठयपुस्तकात विशिष्ट आदिवासी बोलीभाषेचा समावेश करण्यात आला आहे हा एक चांगला संकेत म्हणावा लागेल. आधुनिक आदिवासींचे सामाजिक जीवन अनेक संकटांनी ग्रासलेले दिसते त्याचे पर्यावसन त्यांच्या भाषेवर, त्यांच्या संस्कृतीवर होतो. उदा. आदिवासींना कोणताच धर्म नसतानाही हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मात गोवले गेले आहे. त्यामुळे अदिवासी आपली भाषा व संस्कृती हळूहळू विसरण्याच्या मार्गावर आहे.

आदिवासी समाजात धिम्यागतीने का होईना पण शिक्षणाचा प्रसार होत आहे. जो सुशिक्षित झाला आणि नोकरी निमित्ताने शहरात आला तो आपली संस्कृती, आपली भाषा नकळत विसरला. त्यामुळे आदिवासी बोलीतील कितीतरी शब्द त्यांना माहीतच नाहीत. हे फारच धोक्याचे आहे. उदा. 'इथोस' कादंबरीतील नायक धोंडया हा थोडाफार शिकलेला आहे. पण त्याची नाळ ही कायम आदिवासी पाडयाशी जोडलेली आहे आणि त्याचा भाऊ बाळू हा पोलीस असल्यामुळे तो शहरात असतो त्याला आदिवासी भागातील काही शब्द, वनस्पतींची नांवे माहीत नाही. त्यावेळी पांडया म्हाता–याचे संवाद फार महत्वाचे आहे. "आरं,तू मुलकात असला म्हणून काय आपल्या गांवाकडच्या रितीरिवाज इसरून चालेल काय. आपलं दॅव, धरम, रिती निट सांभाळल्या पाहिजेत. त्या जर पाळल्या नाहीत तर दुनिया कशी चालेलय" थोडक्यात महादेव कोळी या आदिवासी जमातीचा पूर्व इतिहास जसा एक संशोधनाचा विषय आहे, तसाच त्यांचे जीवन, त्यांची भाषा व मौखिक वाङमय हे ही तितकेच वैशिष्टयपूर्ण आहे.

पुणे जिल्हयाच्या पश्चिम पटटयात, सहयाद्रीच्या पर्वत रांगेत डोंगर, द–याखो–यात हा समाज राहत असल्यामुळे भौगोलिक दृष्टया समुद्र सपाटीपासून उंचावर असल्या कारणाने महादेव कोळी समाजाच्या शब्दोच्चारात विशिष्ट हेल जाणवते. 'मावळी बोली' ही मराठीच्या अगदी जवळची वाटते. अत्यंत दुर्गम भागात ही जमात असल्यामुळे त्या प्रदेशाला 'मावळ' प्रांत संबोधले जाते. शिवरायांचे मावळे या अर्थाने त्यांच्यातील कणखरपणा, मार्दव्य आपल्या लक्षात येते. 'मावळी बोलीत' अनेक प्राकृत शब्दांची भेसळ झालेली दिसते. ज्येष्ठ भाषा शास्त्रज्ञ डॉ. अशोक केळकरांनी आदिवासींच्या संदर्भात भाषाशास्त्रीय दृष्टीने खूप महत्वाचे विधान केले आहे. ते म्हणतात की, "जो समाज स्वयंपूर्ण राहू पाहतो, त्या समाजातील

लोकांचे भाषेमार्फत दळणवळणही आपल्यापुरते राहणार आणि त्यामुळे भाषेच्या दृष्टीने ते वेगळे पडणार हे उघड आहे. ह्या भाषांना लेखनव्यवस्था नाही. जी भाषा कधी लिहिली जात नाही. ती भाषा बोलणा–याला निरक्षर कसे म्हणावे, तो उरला अलिखित भाषी, अर्थात हा अलिखित भाषी दुस–याच एखादया भाषेत साक्षर असू शकतो." महादेव कोळी समाजातील अशिक्षित, अज्ञान, निरक्षरतेमुळे त्यांच्या बोलीतील साहित्य म्हणावे असे उपलब्ध नाही. परंतु कित्येक लोक मात्र प्रमाण मराठी, हिंदी कधी इंगजीतही शब्द आपल्या बोलण्यातून व्यक्त करतात.

महादेव कोळी जमातीत 'मावळी बोली' जशी बोलली जाते तशीच 'डांगानी बोली' ही बोलली जाते पण हा प्रदेश कळसुबाई शिखराचा प्रदेश, इगतपुरी, वासाळी, अकोले, धुळे, साक्री या भागात बोलली जाते. हा समाज एक असला तरी या दोन्हीही बोली भाषेत सूक्ष्मफरक जाणवतो. शुध्द मावळी बोलीत आजपर्यंत फारसे लेखन झाले नाही. डॉ. कृष्णा भवारी यांची 'इधोस' कादंबरी आणि डॉ. मारुती अढळ यांच्या 'कथाबोली' या डॉ. संजय लोहकरे, प्रा.यशवंत भांडकोळी यांनी संपादित केलेल्या पाच कथांचा समावेश होतो. तरीही या कलाकृतीत संपूर्ण मावळी बोली येत नाही. पण त्यातील पात्रांच्या तोंडचे सवाद हे मावळी बोलीतील आहेत.
त्या मानाने माडिया, गोंडी, भिल्ल, डांगाणी या बोलींतून ब–याप्रमाणात लेखन आढळून येते. मावळी बोलीतील लोकसाहित्य आणि संकलन मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. डॉ. गोविद गारे यांचे यासंबंधी महत्वपूर्ण योगदान आहे.

समाजशास्त्रीय दृष्टया विचार केला असता आपल्याला असे दिसून येते की, एका विशिष्ट जमातीच्या बोलीभाषेत जर साहित्य उपलब्ध नसेल तर त्या समाजातील लोकांना इतर साहित्य गौण वाटते. आपल्यासाठी हे साहित्य नाहीच अशी त्यांची धारणा होते. म्हणून त्यांच्या भाषेत त्यांच्या सुख:दुखाचे संस्कृतीचे वर्णन ज्यावेळी एखादया कलाकृतीत येईल तेव्हाच त्यांना ती आपली वाटेल. परंतु आधुनिकता आणि कालौघाने या बोलीतील एकएक शब्द नाहीसा होत आहे. त्यामुळे आपोआपच त्यामागची संस्कृती, विधी, संकेत नष्ट होतो. पर्यायाने समाज एका संचित अनुभवाला मुकत असतो. उदा. 'वाघबारस' हा सामाजिका उत्सव नष्ट झाल्यामुळे येणा–या पिढीला हा शब्दच अपरिचित असेल किंवा भलर ही पध्दत संपुष्टात येत असल्यामुळे व्यवसायिक पध्दतीतील हा शब्दही नाहीसा होऊ लागला आहे.

भाषा नष्ट होण्यामागे अनेक कारणे आहेत. सामाजिक दृष्टया काही कारणे ही वैयक्तिक किंवा मानवाने स्वजाणिवेतून दुर्लक्षित केलीआहेत. तर काहीवेळा सामाजिक प्रभावाचा परिणाम म्हणून भाषा लोप पावत आहे. आधुनिक काळत आदिवासीमध्ये मातृसत्ताक समाज हा पितृसत्ताक पध्दतीकडे झुकलेला दिसतो. त्याचबरोबर सभ्य समाजाच्या संपर्कामुळे स्वत:च्या बोलीचा त्याग करुन सभ्य समाजाच्या भाषेचा स्विकार केला. त्यामुळे स्वभाषेचा लोप होत आहे. तसेच सभ्य समाजाच्या संस्कृतीमुळे आदिवासींच्या जीवनात बदल झाले. चालीरिती, धार्मिकता यामध्ये बदल दिसून येतो. हिंद, ख्रिश्चन, मुस्लिम धर्मप्रचारकांनी आदिवासीमध्ये धार्मिक बदल केला त्यामुळे नकळत आदिवासींच्या भाषेवर परिणाम झाला आहे.

सारांश काय तर आज आवश्यकता आहे ती म्हणजे आदिवासींच्या बोलींचे संवर्धन करणे. त्यांचे संकलन करणे बोलीभाषेतील लोकसाहित्याचे संकलन करणे. लोकसाहित्यविषयक मुखपरंपरा योग्य प्रकारे संकलित, संग्रहीत केली जाईल, त्यांच्या भाषेत साहित्यनिर्मिती व्हावी व त्याचे योग्यप्रकारे प्रशंसाही केली जावी. शाळेतून प्राथमिक, प्रारंभिक शिक्षणही मातृभाषेतून दिले जावे. जीवनव्यवहाराची भाषा ज्या त्या प्रदेशातील असावी.

**निष्कर्ष –**

१. आदिवासी हा घटक जागतिक स्तरावरील संशोधनाचा भाग आहे.
२. समाजशास्त्रीय दृष्टया आदिवासींच्या बोलीत भौगोलिक, सामाजिक, आधुनिक घटकांचा प्रवाह पडलेला दिसतो.
३. आदिवासीच्या बोलीत मर्यादित साहित्यनिर्मिती झाली आहे. त्यामुळे त्यांच्यात तटस्थ वृत्ती निर्माण झाली आहे.
४. आदिवासींची भाषा नष्ट होत असली तरीही तिचे संवर्धन करणे काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रथ –**


१. मराठी विश्वकोश, खंड – २, पृ.४०.
२. कल्याण काळे, मृणालिनी शहा (सं.)'निवडक भाषा आणि जीवन' प्रस्तावना,मेहता पब्लिकेशन,पुणे,प्रथम आवृत्ती १९९८
३. कृष्णा भवारी, 'इधोस', चेतक बुक्स, पुणे प्रथम आवृत्ती २०१७, पृष्ठ १४८
४. अशोक केळकर, 'वैखरी : भाषा आणि भाषा व्यवहार', मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९८३
५. अमोल वाघमारे,'मावळी बोली व महादेव कोळी समाजजीवन', प्रफुल्ल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१५
६. संजय साळीवकर, 'भारतीय आदिवासी जीवन', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१४
७. अमोल वाघमारे (सं.)'आदिवासी: काल आज आणि उदया', आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानवविकास केंद्र प्रथम आवृत्ती २०१६
८. कृष्णा भवारी (सं.) 'आदिवासी साहित्य आणिसाहित्यिक', चेतक बुक्स पुणे, प्रथम आवृत्ती २०१३




163

Scanned with CamScanner